सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरिता
वृक्ष लागवड आणि संगोपनासाठी
निधी वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१८/प्र.क्र.११/(भाग-१)/ब-२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२
दिनांक: २३ जुलै, २०१९

संदर्भ :-

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.सावचि-२०१६/प्र.क्र.८०(भाग-२)/फ-११, दि.२५ जुलै, २०१८
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.८ जुलै, २०१९
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय समक्रमांक-दि.२७ मे, २०१९.

प्रस्तावना :-

दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष, पूर, अतिवृष्टी आणि इतर नैसर्गिक आपत्ती यावर उपाययोज़ना म्हणून मोठया प्रमाणावर वृक्ष लागवड करणे आवश्यक असल्याची बाब सर्व स्तरावर मान्य झालेली आहे. राज्यातील वनक्षेत्र २० % वरुन ३३ % पर्यंत नेण्यासाठी हरित महाराष्ट्र ही संकल्पना राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत ५० कोटी वृक्षारोपणाचा कार्यक्रम ३ वर्षामध्ये राबविण्याचा राज्य शासनाने संकल्प केला आहे. वनक्षेत्रावर वृक्ष लागवडीसाठी मर्यादा येत असल्यामुळे वनेत्तर (Non Forest) क्षेत्रावर वृक्ष लागवडीसाठी मोठया प्रमाणात भर द्यावा लागणार आहे. त्यानुसार महसूल व वन विभागातील महसूल उप विभागांतर्गत येणा-या शासकीय जागा, जिल्हाधिकारी /प्रांताधिकारी /तहसिल तसेच नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे/जमाबंदी आयुक्त आणि संचालक,भूमि अभिलेख, पुणे यांच्या अंतर्गत येणारी शासकीय कार्यालये व त्यांच्या मालकीच्या मोकळ्या व पडीक जागा इत्यादी क्षेत्रावर मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करण्यास वाव आहे. त्यानुषंगाने सन २०१९-२० मधील वृक्षारोपणासाठी संभाव्य स्थळे निश्चित करुन त्यानुसार वृक्षारोपणासाठी लँण्ड बँक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. महसूल व वन विभागाच्या दि २५.०७.२०१८ च्या शासन निर्णयास अनुसरुन वृक्ष लागवड व त्यानंतरचे संगोपन यासाठी महसूल उपविभागांतर्गत दि. २७.०५.२०१९ च्या शासन निर्णयानुसार २४०६ एं४४३ हे नवीन लेखाशीर्ष उघडण्यात आले आहे. या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या वर्षासाठी वृक्ष लागवड आणि संगोपन यासाठी निधी उपलब्ध झाला असून सदर निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१९ मधील ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नियोजन, पूर्वतयारी, संभाव्य अडचणी, उपाययोजना याकरिता मागणी क्र. सी-७, २४०६ वनीकरण व वन्य जीवन, ०४ वनीकरण व पर्यावरण विकास, १०१ राष्ट्रीय वनीकरण व पर्यावरण विकास कार्यक्रम, (००) (०१) शाश्वत विकास ध्येय (ध्येय १५- जमिनीवरील सजीव) अंतर्गत वृक्ष लागवड आणि संगोपन (१०० % राज्य योजना), ०२-मजुरी, २१-पुरवठा व सामग्री संगणक संकेतांक (२४०६ एं४४३) या लेखाशीर्षाखाली ०२- मजूरीकरिता रु.२१,५२,०००/-(रुपये एकवीस लक्ष बावन्न हजार फक्त) व २१-पुरवठा व सामग्री करिता

रु.८०,००,०००/- (रुपये ऐंशी लक्ष फक्त) असा एकूण रु.१,०१,५२,०००/- (रुपये एक कोटी एक लक्ष बावन्न हजार फक्त) इतका निधी महसूल या उपविभागांतर्गत सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरिता उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

२. सन २०१९ मधील ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नियोजन, पूर्वतयारी आणि त्यानंतरचे संगोपन याकरिता लागणाऱ्या निधी खालील तक्त्याच्या त्या-त्या कार्यालया समोरील रकाण्यात नमूद केलेली ०२- मजूरी व २१- पुरवठा व सामग्री या उपलेखाशिर्षाखाली दि.०१.०४.२०१९ ते ३१.१२.२०१९ या कालावधीकरीता उपलब्ध झालेली तरतूद संबंधित नियंत्रक अधिका-याकडे या निर्णयाद्वारे सुपूर्द करण्यात येत आहे. तसेच सदर तरतूदी अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे (BDS) उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(आकडे रुपयात)

कार्यालय	०२- मजूरी		२१- पुरवठा व सामग्री	
	सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेली तरतूद	१ एप्रिल २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९ या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी सुपूर्द तरतूद	सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेली तरतूद	१ एप्रिल २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९ या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी सुपूर्द तरतूद
कोकण विभाग	२६९०००	१६१४००	१००००००	६०००००
पुणे विभाग	२६९०००	१६१४००	१००००००	६०००००
नाशिक विभाग	२६९०००	१६१४००	१००००००	६०००००
औरंगाबाद विभाग	२६९०००	१६१४००	१००००००	६०००००
अमरावती विभाग	२६९०००	१६१४००	१००००००	६०००००
नागपूर विभाग	२६९०००	१६१४००	१००००००	६०००००
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक ,पुणे	२६९०००	१६१४००	१००००००	६०००००
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,भूमि अभिलेख, पुणे	२६९०००	१६१४००	१००००००	६०००००

३. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे निधीचे सम प्रमाणात वाटप करण्यात येत आहे.

४ सदर निधी हा सर्व विभागीय आयुक्त/नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे/जमाबंदी आयुक्त आणि संचालक,भूमि अभिलेख, पुणे यांना अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे (BDS) उपलब्ध करुन देण्यात येत असून सदर निधी त्यांच्या अधिनस्त ठेवण्यात येत आहे. मागील वर्षी लावलेल्या रोपांपैकी किती रोपे जिवंत आहेत याचा आढावा घेऊन तसेच २०१९ मध्ये किती रोपे लावण्याचे नियोजन आहे ते निश्चित करुन त्यानंतर त्यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयांच्या आवश्यकतेनुसार त्या निधीचे वाटप करावे.

५. संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी या निर्णयाद्वारे त्यांच्याकडे सुपूर्द केलेले अनुदान त्यांच्या अर्थसंकल्प वितरण नियंत्रणाखाली प्राक्कलन अधिकारी असल्यास त्यांच्याकडे सुपूर्द करावे तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे (BDS) तरतूदी वितरित करण्याची कार्यवाही करावी.

६. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेला निधी खालील अटी व शर्तीच्या अधीन आहे.

१) सदर निधी ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आला आहे, त्या कारणासाठीच याचा विनियोग करणे बंधनकारक आहे. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागीय आयुक्त / नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे /जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे अधिनस्त कार्यालयांची राहील.

२) सदर निधीतून केलेल्या खर्चाचे वेगळे लेखे विभागीय आयुक्त / नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे अधिनस्त कार्यालयाने ठेवणे आवश्यक आहे.

३) शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांनुसार जिल्हाधिकारी/अधिनस्त कार्यालयाने सर्व अधिनस्त कार्यालयांकडून वेळोवेळी अद्ययावत माहिती प्राप्त करुन घेऊन संपूर्ण वर्षाकरिता आवश्यक निधीची गणना करुन वितरणाचे संपूर्ण वर्षाचे स्वतंत्र विवरणपत्र तयार करणे आवश्यक आहे. ज्यायोगे विवरणपत्रानुसार सर्व कार्यालयांना सदर निधी आवश्यकतेनुसार व त्वरीत अदा करणे शक्य होईल. या संदर्भात जिल्हाधिकारी/अधिनस्त कार्यालयाने शासनास, विभागीय आयुक्त कार्यालयास/नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे/जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे व महालेखापाल कार्यालयास वेळोवेळी अचूक माहिती देणे शक्य होईल. तसेच निधीचा हिशोब परिपूर्ण राहील.

४) सदर रक्कम अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे (BDS) उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे सदर रक्कम अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे (BDS) काढून घेऊन ती तात्काळ संबंधितांना वितरीत करावी. शासनाने वितरीत केलेला निधी संबंधितांना विनाविलंब मिळेल याची दक्षता विभागीय आयुक्त/नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे/जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांनी घ्यावी व याबाबतची जबाबदारी संबंधित कार्यालयांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची राहील.

५) महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई आणि महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर यांना तसेच शासनास किंवा शासनाने त्यासाठी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास लेखा परिक्षणाकरिता संबंधित कार्यालयाची पुस्तके व लेखापाहणीचा अधिकार राहील यासाठी कार्यालयांनी सर्वतोपरी सहकार्य द्यावे.

६) उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० मध्ये वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित कार्यालयांनी विभागीय आयुक्त/नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे/जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांचे मार्फत शासनास सादर करावे.

७) सदर निधी वितरीत करताना वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि. ८ जुलै,२०१९ मधील सुचनांचे तंतोतंत पालन करावे.

७. सदरचा खर्च "महसूल व वन विभाग, मागणी क्र. सी-७, २४०६ वनीकरण व वन्य जीवन, ०४ वनीकरण व पर्यावरण विकास, १०१ राष्ट्रीय वनीकरण व पर्यावरण विकास कार्यक्रम, (००) (०१) शाश्वत विकास ध्येय (ध्येय १५ -जमिनीवरील सजीव) अंतर्गत वृक्ष लागवड आणि संगोपन (१०० % राज्य योजना) ०२-मजुरी २१-पुरवठा व सामग्री संगणक संकेतांक (२४०६ ए४४३) " या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून तो सन २०१९-२०२० या वर्षाकरीता उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

८. तसेच वितरित निधीचा खर्चमेळ याबाबतची कार्यवाही निधी प्राप्त झालेल्या संबंधित कार्यालयाने पूर्ण करुन खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्त/नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे/जमाबंदी आयुक्त आणि संचालक,भूमि अभिलेख, पुणे यांना पाठवावीत. सर्व विभागीय आयुक्त/नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे/जमाबंदी आयुक्त आणि संचालक,भूमि अभिलेख, पुणे यांनी निधीच्या खर्चाचा, महालेखापालांकडे नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा व अहवाल शासनाकडे पाठवावा.

९. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०८.०७.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२३१२०७२२७२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KIRAN PANDURANG WADTE

Digitally signed by KIRAN PANDURANG WADTE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=092f3d18dd73e55dfcdc33acd72708a0290e9758bc4e1500205b182e2d843c82, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=REVENUE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KIRAN PANDURANG WADTE
Date: 2019.07.23 12:22:42 +05'30'

(कि.पां.वडते)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा परिक्षा)/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई (दोन प्रती)
२. महालेखापाल (लेखा परिक्षा)/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-२ नागपूर (दोन प्रती)
३. सर्व विभागीय आयुक्त
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
५. अपर प्रधान मुख्य संरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. व्यवस्थापकीय संचालक, वन विकास महामंडळ, नागपूर.
७. वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त, कोकण ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती,नागपूर.

८. नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे/जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख पुणे

९. सर्व जिल्हाधिकारी,

१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

११.वित्त विभाग,(अर्थसंकल्प-६ आणि व्यय-१०,मंत्रालय,मुंबई)

१२.नियोजन विभाग (का.१४७५), मंत्रालय, मुंबई.

१३.अवर सचिव, फ-११, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई.

१४.निवड नस्ती (कार्यासन ब-२)